साक्षीदार क्र **०१** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–प्रशांत गोविंदराव पाल
वय ३५ वर्ष, व्यवसाय– शेती
राह.हिवरा–हिवरी, ता.उमरेड, जि.नागपूर.

**सरतपासणी सरकारी वकील श्री.व्ही.यु.मिरचे यांच्या मार्फत**

१. दि.१९/१२/२०२० रोजी पोलिसांनी मला पंचनामा करण्याकामी घटनास्थळावर बोलवले नव्हते. त्यावेळी पोलिसांनी मला थांबविले व येथे सही कर असे मला म्हणाले. आता मला समन्स पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहिती नाही. सहीला **निशाणी क्र.१०** देण्यात आला. पोलिसांनी माझ्यासमक्ष कोणताही पंचनामा केला नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहीत नाही. सहीला **निशानि क्र.११** देण्यात आले. आता मला फोटो दाखविण्यात आला त्यामध्ये माझा फोटो आहे. त्याला **आर्टीकल अ** देण्यात आले. मी आरोपीला ओळखत नाही.

**सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्द्यावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.१९/१२/२०२० रोजी बेसुर ते हिवरा–हिवरी जाणा–या डांबरी रोडवर पोलिसांनी मला घटनास्थळावर पंचनामा करण्याकामी बोलविले होते व तेथे ऑटोचा अपघात झाल्याबाबत माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार करण्यात आला होता. मी किरण भोंडे याला ओळखतो तो तेथे हजर होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष कारवाई करून घटनास्थळ पंचनामा तयार केला मला वाचुन दाखविला त्यातील मजकूर खरा व बरोबर असल्याची खात्री करून मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**
**आरोपीतर्फे ॲड.एम.ए.भुरे यांनी उलटतपास नाकारला.**
**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.२०.०३.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड